# १४ आर्थिक सुधारणा






☞ भारतात 1991 पासून आर्थिक सुधारणेला प्रारंभ झाला.

☞ 1991 मधील आर्थिक परिस्थिती स्थिर करण्यासाठी पी.व्ही. नरसिंहराव व मनमोहन सिंह यांनी भारतात आर्थिक सुधारणा घडून आणल्या आहेत.

☞ 1991 मध्ये नवीन औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले.

☞ खा.उ.जा. म्हणजे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण हे धोरण जाहीर करण्यात आले. त्यास LPG असेही म्हणतात.

**L - Liberalisation** - उदारीकरण
**P - Privatisation** - खाजगीकरण
**G - Globalisation** - जागतिकीकरण




## ❍ आर्थिक सुधारणांचा अर्थ :-

"आर्थिक सुधारणा म्हणजे, ज्यामुळे अर्थव्यवस्थेच्या मुलभूत वैशिष्ट्यामध्ये बदल होतो. हा बदल नियंत्रणाकडुन उदारिकरणाकडे होतो."

☞ 1985 मध्ये राजीव गांधी यांनी नविन आर्थिक धोरणांचा प्रारंभ केला.

☞ याच आर्थिक सुधारणा पुढे राव व मनमोहन सिंह सरकारने जाहीर केल्या.

## ❍ नविन आर्थिक धोरणाची आवश्यकता / कारणे :-

1. आर्थिक स्थिरता प्राप्त करणे.
2. प्रतिकुल व्यापार धोरण.
3. खाडी युद्ध (अरब देशातील तेलाच्या किमतीत वाढ)
4. कर्जाचा भार.
5. देशांतर्गत दुष्काळ.
6. परकीय गंगाजळीत घट (परकीय चलनात घट) (दोनच आठवडे पुरेल इतकेच परकीय चलन भारताकडे उपलब्ध होतो).
7. रुपयाचे अवमूल्यन. इत्यादी.

## उदारीकरण (Liberalisation)

उदारीकरण म्हणजे - "बाजार यंत्रणा आणि मुक्त स्पर्धा यातील अडथळे दुर करण्याचे सरकारचे धोरण होय."

**डॉ. व्ही.एस. छत्री :-**

निर्यातीस प्रतिबंध करणाऱ्या घटकांची तीव्रता कमी करण्यासाठी बाजाराधिष्ठित किंमत यंत्रणा स्विकारण्याच्या प्रक्रियेस उदारीकरण म्हणतात.

☞ "परवाने, आयात कोटा, प्रशुल्क (आंतरराष्ट्रीय कर) इत्यादी आर्थिक विकासात अडसर अनावश्यक नियंत्रणे कमी करुन अर्थव्यवस्था मुक्त करणे होय."

## ❍ उदारीकरणातील घटक (Factors) :-

1. औद्योगिक परवाना पद्धत रद्द करणे.
2. आयातीवरील बंधने शिथिल (कमी) करणे.
3. भारताची वित्तीय व्यवस्था सुधारणे.
4. विदेशी चलन विनिमयावरील नियंत्रणे हटविणे.
5. करदरात सुधारणा करणे.
6. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचे खाजगीकरण करणे. (उदा. विज उद्योग)
7. विदेशी चलन विनिमय कायदा रद्द करणे.
8. अनुदानावर मर्यादा आणने.

## उदारीकरणाचे प्रकार

**1) सौम्य उदारीकरण :-**

उदारिकरण असताना देखील विदेशी व्यापारासंबंधी सरकारचे अर्थव्यवस्थेवर नियंत्रण असणे होय.

**2) तीव्र उदारीकरण :-**

विदेशी व्यापारावर कमीत-कमी नियंत्रण असल्यास त्यास तीव्र उदारीकरण म्हणतात.

☞ भारतात तीव्र उदारीकरण उपयुक्त ठरते.

## ❍ भरतातील आर्थिक उदारीकरणाचा इतिहास / टप्पे :-

### 1) 1975-80 चा कालखंड :-

☞ ऑक्टोबर 1975 मध्ये भारताने 21 उद्योग परवाना मुक्त केले.

☞ 1975 मध्ये MRTP - कायद्यांतर्गत 40% विदेशी भांडवल असणाऱ्याची नियंत्रणे काढली.

(MRTP - Monopolistic Restrictive Trade Practicer - उद्योगातील मक्तेदारी विषयक कायदा - 1969 मध्ये पास करण्यात आला. सन 2002 मध्ये MRTP चे रुपांतर Competition Act स्पर्धा कायद्यात झाले तर 2009 मध्ये CCI - Compitation Comission of India ची स्थापना करण्यात आली - उद्योगातील घराणेशाही मोडीत काढण्यासाठी या कायद्याचा वापर.)

☞ 1975-80 : भांडवलशाहीचा पुरस्कार.

☞ 1979-80 : सौधी व अलेक्झांडर समितीच्या शिफारशीवरुन भांडवली वस्तू आयात, कच्चया मालावरील निर्बंध शिथील करण्यात आले.

### 2) 1980-85 चा कालखंड :-

☞ उद्योगांना 25% पर्यंत उत्पादन क्षमता वाढवण्यास परवानगी.

☞ 1982 MRTP कायद्यानुसार कंपन्यांना मागास भागात उद्योग सुरु करण्याची परवानगी.

### 3) 1985-90 चा कालखंड :-

☞ 1986-87 मध्ये 27 उद्योगांना MRTP कायद्याच्या कक्षेबाहेर आणण्यात आले.

☞ MRTP कायद्यानुसार कंपन्याच्या मतांची 20 कोटी वरुन 100 कोटी वाढवण्यात आली.

☞ Electronics उद्योगाच्या आयातीला पुर्ण (100%) परवानगी देण्यात आली.

## ❍ भारत सरकारणे उदारीकरणासंबंधीचे निर्णय :-

### 1) उद्योग परवाना मुक्त केले - (6 उद्योग वगळता)

### 2) कर पद्धतीत सुधारणा :-

☞ विकसनशील देशात एकुण करामध्ये प्रत्यक्ष कराचे प्रमाण 50 ते 65% असते.

☞ 1991 मध्ये ते 40% पर्यंत कमी केले गेले.

☞ राजा चेलया समितीनुसार 30% पर्यंत कमी करण्यात आला.

☞ करमुक्त उत्पन्न 1974-75 मध्ये 36,000/- रु. होते भूतलिंगम, राजा चेलया व केळकर समितीच्या शिफारशीवरुन ती 2 लाख रुपये करण्यात आली.

☞ चेलया समितीनुसार निगम कर कमी करण्याची शिफारस करण्यात आली 1991-92 मध्ये हा कर 51.75% होता.

### 3) विदेशील गुंतवणूकदारांना मुक्त प्रवेश :-

☞ विदेशी थेट गुंतवणुकीत सुरुवातीला 51% नंतर 74% व 100% असे प्रोत्साहन देण्यात आले.

### 4) औद्योगिक सुधारणा :-

☞ **24 जुलै, 1991 ला नविन औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले.**

☞ अनुसूची अ - मधील 17 उद्योग केंद्राच्या मालकीचे.

☞ 5 उद्योग सोडुन इतर उद्योग परवाना मुक्त करण्यात आले. 5 उद्योग - दारु-मादक पदार्थ, तंबाखु-सिगारेट, संरक्षण, ज्वलनशील व घातक पदार्थ.

☞ परवाना धोरणावर नियंत्रण ठेवणारा MRTP कायदा रद्द करण्यात आला आहे. त्या एवजी 2002 स्पर्धा कायदा (Competition Act) तयार करण्यात आला आहे.

☞ FEMA कायदा लागू :-
Foreign Exchange Regulation Act - FERA चे सन 1991 मध्ये Foreign Exchange Management Act FEMA मध्ये रुपांतर करण्यात आले.

### 5) खाजगी क्षेत्राला परवानगी :-

☞ उदारिकरणाच्या धोरणातुन खाजगी बँक, विमा कंपन्या, विदेशी बँका कंपन्या इत्यादींना प्रवेशाची परवानगी देण्यात आली.

### 6) कर्ज सुधारणा :-

☞ भारताच्या कर्जात कपात करण्यासाठी खालील योजना आखण्यात आल्या.

☞ 1990-95 नवव्या वित्त आयोगाच्या शिफारशीप्रमाणे राज्यांचा कर्जाचा दर कमी करण्यासाठी 494 कोटी रुपये केंद्रीय मदत देण्याचे ठरविले.

☞ 10 व्या वित्त आयोगाच्या शिफारशी प्रमाणे राज्यांनी कर्जाचा वापर महसुली तुट भरुन काढण्यासाठी करु नये.

### 7) उद्योगांच्या बाबतीत राज्याची मक्तेदारी संपुष्टात आणण्यात आली. (रेल्वे व अणुऊर्जा वगळून)

### 8) RBI ने नियंत्रकाएवजी प्रोत्साहन म्हणुन काम केले व बँकांवरील निर्बंध कमी केले.

### 9) उदार व्यापार धोरण स्विकारण्यात आले.

### 10) रुपयाची परिवर्तनीयता :-

☞ विदेशी चलन व्यवहारावरचे नियंत्रण रद्द करण्यात आले.
☞ रुपया व्यापारखाते व चालू खात्यावर परिवर्तनीय करण्यात आला.

☞ सध्या रुपयाचा विनिमय दर मागणी पुरवठ्यावरुन ठरतो त्यास मुक्त विनिमय दर म्हणतात.

## 11) सेबीची स्थापना (SEBI) :-

☞ 12 एप्रिल, 1988 रोजी SEBI ची स्थापना अवैधानिक स्वरुपात करण्यात आली.

☞ SEBI रोखे बाजार किंवा शेअर बाजारावर नियंत्रण ठेवणारी संस्था होय.

☞ 30 जानेवारी, 1992 रोजी राष्ट्रपतींच्या वटहुकुमाद्वारे SEBI वैधानिक दर्जा देण्यात आला.

☞ 4 एप्रिल, 1992 मध्ये वटहुकुमाचे रुपांतर संसद कायद्यात झाले.

## 12) खर्च खुलासा :-

☞ राजकोषिय तुट कमी करण्यासाठी खर्चामध्ये कपात करण्यात आली.

☞ 1979 मध्ये चरणसिंह यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक खर्च आयोग नेमण्यात आला.

☞ 1987-88 मध्ये शुन्य आधारित अर्थसंकल्प मांडण्यात आला.

## ❍ उदारिकरणाचे फायदे :-

1. आर्थिक विकास
2. रोजगारांच्या संबंधीत वाढ
3. उत्पादन गुणवत्तेत वाढ
4. भांडवलशाहीचा प्रसार
5. लघु उद्योगांवर प्रतिकुल परिणाम
6. उत्पादन खर्चात घट

## ❍ मर्यादा / दोष :-

1. गरिब व अविकसित राष्ट्रात धोकादायक.
2. भांडवलशाही वाढ.
3. परावलंबीत्व वाढते.
4. वित्तीय तुट कमी झाले नाही.

# भारत सरकारणे उदारीकरणासंबंधीचे निर्णय

1) **उद्योग परवाना मुक्त केले (6 उद्योग वगळता)**
2) **कर पद्धतीत सुधारणा**
3) **विदेशी गुंतवणूकदारांना मुक्त प्रवेश**
4) **औद्योगिक सुधारणा**
5) **खाजगी क्षेत्राला परवानगी**
6) **कर्ज सुधारणा**
7) **राज्याची मक्तेदारी संपुष्टात**
8) **RBI ने बँकांवरील निर्बंध कमी केले**
9) **उदार व्यापार धोरण**
10) **रुपयाची परिवर्तनीयता**
11) **सेबीची स्थापना (SEBI)**
12) **खर्च खुलासा**

# खाजगीकरण (Privatisation)

**अर्थ :-**

"सार्वजनिक मालकीचे उद्योग खाजगी मालकीचे करणे."

**डी. आर. पेंडसे :-**

"खाजगीकरणामुळे आर्थिक क्रियेतील राज्य किंवा केंद्राच्या वाटा घटतो."

**पिटर ड्रूकर :-**

शासनाकडुन खाजगी क्षेत्रातील निर्गुंतवणुक म्हणजे खाजगीकरण होय."

## निर्गुंतवणुक म्हणजे :-

☞ निर्गुंतवणुकीलाच अपगुंतवणुक म्हणतात.

☞ म्हणजे सार्वजनिक उद्योगामधील केंद्र किंवा राज्य शासनाची गुंतवणुक काढुन घेणे किंवा तिचे खाजगीकरण करणे होय.

☞ ॲडम स्मिथने - 1776 मध्ये 'Wealth of Nation' या ग्रंथात निर्हस्तक्षेपाचे धोरण जाहीर केले.


☞ निर्हस्तक्षेप म्हणजेच अर्थव्यवस्थेत शासनाचा हस्तक्षेप नसावा म्हणजेच उद्योग खाजगी मालकीचे असावेत.




☞ भारतात 1980 मध्ये खाजगीकरण सुरुवात झाली.

## खाजगीकरणाची उद्दिष्ट्ये :-

1. सरकारी मालकीचे उद्योग खाजगी व्यक्तींकडे देणे.
2. सरकारी मालकीचे उद्योग व्यवस्थापन खाजगी व्यक्तींकडे देणे.
3. सरकारी उद्योग अंशत: किंवा पुर्णत: खाजगी करणे.
4. उद्योगात मुक्त व्यापारी धोरणांचा अवलंब करणे.
5. शासकीय उद्योगांचा तोटा कमी करणे.
6. उद्योग व्यवस्थापनाचा दर्जा सुधारणे.
7. अविकसित क्षेत्राचा विकास साध्य करणे.
8. शासकीय उत्पन्नात वाढ करणे.



## खाजगीकरणाची व्याप्ती :-

निर्गुंतवणुक आयोग - (Disinvestment Commission)

### 1) जुलै 1991 मध्ये डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली पहिली निर्गुंतवणुक समिती नेमली.

**उद्देश :-**

शासकीय भागभांडवलाचा वाटा कमी करणे शेअर्सची विक्री करणे. सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण करणे.

**जबाबदारी :-**

- ☞ सार्वजनिक क्षेत्रातील निर्गुंतवणुकीचे निकष ठरविले.
- ☞ सार्वजनिक भागाची (Shares) ची किंमत ठरविणे.
- ☞ या समितीने 26% 51% गुंतवणूक असलेल्या सार्वजनिक उद्योगाचे 100% खाजगीकरण करण्याची शिफारस केली.

### 2) सार्वजनिक क्षेत्र निर्गुंतवणुक आयोगाची स्थापना :- Dec.1996

- ☞ केंद्र शासनाने 23 ऑगस्ट, 1996 मध्ये पी.व्ही. रामकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाची स्थापना केली.

### 3) निर्गुंतवणुक विभागाची स्थापना :-

- ☞ केंद्र सरकारच्या निर्गुंतवणुकीचा कारभार पाहण्यासाठी 10 डिसेंबर, 1999 रोजी 'निर्गुंतवणुक विभागाची' स्थापना करण्यात आली.
- ☞ या विभागाला मंत्रालयाचा दर्जा देण्यात आला.

### 4) राष्ट्रीय गुंतवणुक निधीची स्थापना :-

- ☞ 27 जानेवारी, 2005 रोजी 'राष्ट्रीय गुंतवणुक निधी' स्थापन करण्यात आला.
- ☞ यात अल्पमतातील शासकीय गुंतवणुक विकुन त्या रक्कमाचा समावेश निधीमध्ये करावा.

### 5) खाजगीकरणातुन विमानतळ :-

- ☞ खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने दिल्ली व मुंबई विमानतळाचे नुतनिकरण.
- ☞ 'एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया' ही संस्था त्यास मदत करेल.

### 6) उद्योगांना नवरत्नांचा दर्जा :-

- ☞ सन 1997 मध्ये सार्वजनिक मालकीच्या 9 उद्योगांना नवरत्नांचा दर्जा देण्यात आला.

1. Indian Oil Corporation
2. Oil & Natural gas Corporation
3. HPCI
4. Bharat Petrolium.
5. Indian Petro Chemical Ltd.
6. विदेश संचार
7. भारत हेवी इलेक्ट्रीकल्स
8. स्टॉल ॲथॉरिटी
9. नॅचरल थरमल कॉर्पोरेशन

### 7) खाजगी हवाई टॅक्सी सेवा :-

- ☞ सन 1990 पासुन शासनाने खाजगी हवाई टॅक्सी सेवा सुरु केली आहे.
- ☞ निवासी किंवा अनिवासी व्यक्ती अशा सुविधा देवु शकतात.

## खाजगीकरणाचे फायदे :-

- ☞ खाजगी उद्योगांच्या स्पर्धेमुळे शासकीय उद्योगही गतिशील.
- ☞ श्रमिकांच्या कार्यक्षमतेत वाढ.
- ☞ उद्योगिक व्यवस्थापनामुळे नफ्यामध्ये वाढ.
- ☞ स्पर्धेतुन वस्तुच्या किमतीत वाढ.
- ☞ रोजगार वृद्धी होते.
- ☞ सार्वजनिक पैशाचा अपव्यय टाळता येतो.

### मर्यादा / दोष :-

- गृाहकहिताकडे दुर्लक्ष.
- नफेखोरीच्या प्रमाणात वृद्धी होते.
- शासकीय अधिकाऱ्याकडून खाजगीकरण विरोध.
- श्रमिकांची शासकीय सेवेप्रमाणे सुरक्षितता कमी होते.
- भांडवलदाराकडे संपत्तीचे केंद्रीकरण होते.

### जागतिकीकरण (Globalisation)

राष्ट्रीय अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेशी जोडली जाणे म्हणजे जागतिकीकरण होय.

**1) दीपक नायर :-**

देशाच्या राजकीय सीमांमध्ये आर्थिक क्रियांचा विस्तार करणे.

**2) जागतिक बँक :-**

"ज्या व्यवस्थेत सर्व वस्तूच्या आयातीवरील नियंत्रणे समाप्त केली जातात / आयात शुल्क कमी केला जातो व सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण होते त्यास जागतिकीरण म्हणतात."

- जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्था अधिक मुक्त बनते.
- आधुनिक दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व प्रगत वाहतुक या घटकावर जागतिकीरण अवलंबुन आहे.

### जागतिकीकरणाचे वैशिष्ट्ये :-

- आधुनिक दळणवळण.
- बिगर शासकीय संघटनांची सक्रियता.
- मुक्त स्पर्धा.
- आंतरराष्ट्रीय संबंध.
- बहुराष्ट्रीय कंपन्याची आघाडी.
- आर्थिक संघटनांची भुमिका.

### जागतिकीकरणा विषयी भारतातील व्याप्ती :-

**1) FEMA कायदा लागू :-**

1973 च्या FERA (विदेशी विनिमय नियंत्रण कायदा) चे 2000-01 मध्ये FEMA (विदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा) या रुपांतर झाले. यामुळे विदेशी कंपन्यांना भारतात गुंतवणूक करणे सोपे झाले.